# MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

Centre No.1, 13th Floor, World Trade Centre,
Cuffe Parade, Mumbai - 400005.
**Tel :** 022 - 22163964 / 65 / 69 **Fax :** 022 - 22163976
**Email :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

Advt. No. ----/2019-20

## PUBLIC NOTICE

**Inviting comments on draft Maharashtra Electricity Regulatory Commission (Specific Conditions of Distribution Licence applicable to Indian Railways for its Distribution Operations in Maharashtra) Regulations, 2019**

Indian Railways is a Department of the Government of India, Ministry of Railways with Headquarters at Rail Bhawan, Raisina Road, New Delhi - 110001 which is operating the rail system in the State of Maharashtra as per the provisions of the Railways Act, 1989 through its Central Zone, Western Zone, South Central Zone and South East Central Zone.

In terms of the Order passed by the Central Electricity Regulation Commission on 5 November, 2015 and the Order passed by the Commission on 21 December, 2018, Indian Railways is a Deemed Distribution Licensee for carrying out distribution activities for ensuring supply of power in connection with working of the railways. The Commission vide Order dated 5 September, 2019 in Case No. 154 of 2019 has stated that it shall separately specify the Specific Conditions of Distribution Licence applicable to Indian Railways.

The Commission under Section 16 of the Electricity Act, 2003 has prepared the draft MERC (Specific Conditions of Distribution Licence applicable to Indian Railways for its Distribution Operations in Maharashtra) Regulations, 2019. A copy of the said draft Regulations is available on the Commission's website www.merc.gov.in in downloadable format alongwith the Explanatory Memorandum. Comments, suggestions or objections on the draft Regulations may be sent to **the Secretary, MERC, 13th Floor, Centre No.1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005** by hand or by post or by Fax or E-mail [Fax: 022-22163976; E-mail : mercindia@merc.gov.in] **on or before 9 January, 2020.**

All suggestions and / or objections received on or before **9 January, 2020** shall be considered by the Commission.

**Place :- Mumbai**
**Date : 9 December, 2019**

**Secretary,**
**Maharashtra Electricity Regulatory Commission**

8 X 16

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र.१, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५.
**दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४/६५/६९ फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६**
**ई-मेल** : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेत-स्थळ** : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

जाहिरात क्र. ---/२०१९-२०

## जाहीर सूचना

**प्रारूप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (भारतीय रेल्वेला महाराष्ट्रातील त्यांच्या वीज वितरण कार्यासाठी लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१९ वर अभिप्राय मागविण्याबाबत**

भारतीय रेल्वे हा रेल्वे मंत्रालयाच्या अधिनस्थ असलेला भारत सरकारचा एक विभाग आहे. त्याचे मुख्यालय रेल भवन, रायसिन रोड, नवी दिल्ली-११०००१ येथे असून रेल्वे अधिनियम, १९८९ च्या तरतुदींनुसार तो मध्य परिमंडल, पश्चिम परिमंडल, दक्षिण मध्य परिमंडल आणि दक्षिण पूर्व मध्य परिमंडलाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यातील रेल्वे यंत्रणेचे संचालन करीत आहे.

केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने दि. ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी पारित केलेला आदेश आणि आयोगाने दि. २१ डिसेंबर, २०१८ रोजी पारित केलेला आदेश यांच्या अनुषंगाने, रेल्वेच्या कामकाजा संबंधात खात्रीशीर विद्युत पुरवठ्यासाठी वीज वितरणाचे कार्य करण्यासाठी भारतीय रेल्वे एक मानीव वितरण परवानाधारक आहे. आयोगाने सन २०१९ च्या प्रकरण क्र. १५४ मध्ये दि. ५ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या आदेशान्वये भारतीय रेल्वेला लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी स्वतंत्रपणे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे नमूद केले आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ अंतर्गत, आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (भारतीय रेल्वेला महाराष्ट्रातील त्यांच्या वीज वितरण कार्यासाठी लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१९ चे प्रारुप तयार केले आहे. सदर प्रारुप विनियमांची प्रत त्यांवरील चर्चा-पत्रिकांसह www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात ठेवण्यात आली आहे. या प्रारुप विनियमांवर अभिप्राय, सूचना किंवा हरकती **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०००05** येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६ किंवा ई-मेल - mercindia@merc.gov.in द्वारा या पत्त्यावर **दि. ९ जानेवारी, २०२०** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

**दि. ९ जानेवारी, २०२० रोजी** किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व सूचना आणि हरकती आयोगाकडून प्रारुप विनियमांस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील.

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- ९ डिसेंबर, २०१९**

**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

8 X 16